विजेते ग्राहक देखील लकी ड्रॉ घोषित केल्यानंतर तीन दिवसांच्या आत जवळच्या महावितरण कार्यालयात संपर्क साधू शकतात.

३. विजेत्या ग्राहकाने खालील कागदपत्रांच्या प्रती महावितरणच्या संबंधित उपविभागीय / विभागीय कार्यालयात सदर करणे आवश्यक आहे.:

१) ओळखीचा पुरावा जसे की पॅन कार्ड

२) वास्तवाच्या पुरावा जसे की आधार कार्ड

३) चालू महिन्याच्या वीज देयकाची प्रत

४) जर बिलाचे ग्राहक नाव (नोंदणीकृत ग्राहक) बक्षीसाचा दावा करणाऱ्या व्यक्तीपेक्षा वेगळे असेल तर,भाडेकरू करार किंवा संबंधित दस्तऐवज आणि मालक/नोंदणीकृत ग्राहकाकडून ना-हरकत प्रमाणपत्र.

५) जर नोंदणीकृत ग्राहक मयत झाला असेल आणि कायदेशीर वारस बक्षीसाचा दावा करत असेल, मृत्यू प्रमाणपत्र आणि कायदेशीर वारस प्रमाणपत्र.

४. विजेत्या ग्राहकाने पडताळणीसाठी मूळ कागदपत्र सदर करणे आवश्यक आहे.

५. विजेत्या ग्राहकाने मिळालेले बक्षीस उघडण्याचा (unwrapping) व चालू (activate) करण्याचा व्हिडिओ रेकॉर्ड करणे अनिवार्य आहे.

६. विजेते ग्राहक बक्षीस वस्तूच्या उत्पादक/सेवा प्रदात्यां कंपनीच्या जवळच्या सेवा केंद्राला भेट देऊन वॉरंटी सेवांबाबत दावा करू शकतात.



महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# लकी डिजिटल ग्राहक योजना

महावितरणच्या LT Live ग्राहकांसाठी लकी ड्रॉ योजना
(तीन मासिक लकी ड्रॉ)

## ऑनलाईन वीज देयक भरा आणि जिंका




३००० पेक्षा अधिक बक्षिसे

Smart Watch



Mobile Phone



लकी ड्रॉ योजनेत सहभागी होण्यासाठी, ०१ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ दरम्यान सलग तीन महिने ऑनलाईन पध्दतीने वीज देयक भरा.

*अटी व शर्ती लागू.

www.mahadiscom.in @MSEDCL @MSEDCL @msedclofficial @mahavitaranofficial

**०१ जानेवारी २०२५ पासून महावितरणने जाहीर केलेल्या ''लकी डिजिटल ग्राहक योजना'' लकी ड्रॉ योजनेवरील दस्तऐवज.**

**योजनेचे तपशील आणि पात्रता:**

१. तीन मासिक लकी ड्रॉ योजना – उपविभाग स्तरावर

२. योजनेच्या कालावधीत सलग मागील तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिन्यांपासून ऑनलाइन पद्धतीने पैसे भरणाऱ्या आणि रु.१०/– पेक्षा कमी थकबाकी असलेल्या ग्राहकांसाठी

३. योजनेचा कालावधी: पाच महिने (०१.०१.२०२५ ते ३१.०५.२०२५ पर्यंत)

४. एप्रिल–२०२५, मे–२०२५ आणि जून–२०२५ मध्ये अनुक्रमे पहिला, दुसरा आणि तिसरा लकी ड्रॉ काढण्यात येईल.

| बक्षिसे | प्रत्येक लकी ड्रॉसाठी बक्षिसे | प्रत्येक लकी ड्रॉसाठी विजेत्यांची संख्या | प्रतीक्षा यादी |
|---|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | स्मार्ट फोन | एक भाग्यवान विजेता | प्रत्येक बक्षिसासाठी दोन ग्राहक |
| दुसरे पारितोषिक | स्मार्ट फोन | दोन भाग्यवान विजेते | |
| तिसरे पारितोषिक | स्मार्ट घड्याळ | दोन भाग्यवान विजेते | |

**पात्रता अटी:**

१. ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (LT Live) वीजग्राहकांसाठी लागू असेल, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही.

२. सदर योजना सार्वजनिक पाणीपुरवठा आणि पथ दिवे श्रेणीतील ग्राहकांना, तसेच फ्रँचायझी क्षेत्रातील ग्राहकांना लागू राहणार नाही.



महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना

३. ग्राहकास योजनेच्या कालावधीत ऑनलाइन भरणा पर्याय (नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, NACH, क्यूआर कोड, NEFT, RTGS इ.) वापरून सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने भरणा करणे आवश्यक राहील.

४. लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिन्यात, दरमहा एक असे, ऑनलाईन भरणा पर्याय वापरून देयक अदा करणे आवश्यक राहील.

५. दरमहा वीज देयक भरणा किमान रक्कम रु. १००/– असणे आवश्यक आहे.

६. ज्या महिन्यामध्ये लकी ड्रॉ घोषित केला जाईल, त्याच्या आधीच्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी ग्राहकाची वीज देयक थकबाकीची रक्कम रु.१०/– पेक्षा कमी असावी.

७. योजनेच्या कालावधीत ग्राहक/ग्राहक क्रमांक फक्त एकाच बक्षीसासाठी पात्र असेल.

**योजनेला लागू अटी व शर्ती:**

१. सदर योजना महावितरणच्या वतीने ग्राहकांना ऑनलाइन पेमेंट करण्यास प्रोत्साहित करण्याच्या प्रयत्नांपैकी एक आहे. सदर योजना कोणत्याही प्रकारचे जुगार किंवा तत्सम गोष्टींना पाठिंबा / प्रोत्साहन देत नाही.

२. सदर योजना सर्व ग्राहकांना विजेते बनवण्याची हमी देत नाही. सदर योजने अंतर्गत विजेत्यांच्या निवडीसाठी पारदर्शक संगणकीय पद्धतीने यादृच्छिक क्रमांक निवड प्रक्रिया (computerised random number selection process) वापरली जाईल.

३. ज्या महिन्यामध्ये लकी ड्रॉ घोषित केला जाईल,त्याच्या आधीच्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी ग्राहकाची वीज देयक थकबाकीची रक्कम

रु.१०/– पेक्षा जास्त असलेल्या कनेक्शनसाठी लकी ड्रॉ लागू होणार नाही.

४. सदर योजने बाबत ग्राहकांना जागरूक करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले गेले जातील परंतु महावितरण प्रत्येक ग्राहकाशी थेट संवाद साधण्याची हमी देत नाही. सदर योजनेच्या प्रसिद्धी साठी महावितरणकडून विविध माध्यमांद्वारे प्रयत्न केले जातील जसे कि , महावितरणच्या वेबसाइट वर, वर्तमान पत्रांद्वारे , ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर संदेश इत्यादी

५. सदर योजनेत प्रथम पारितोषिकासाठी एक विजेता, द्वितीय पारितोषिकासाठी दोन विजेते आणि तृतीय पुरस्कारासाठी दोन विजेते असतील. तसेच पात्र विजेत्या ग्राहक क्रमांकाव्यतिरिक्त, प्रत्येक बक्षीसासाठी दोन अतिरिक्त ग्राहक क्रमांक (प्रतीक्षा यादी ग्राहक क्रमांक) निवडले जातील. मूळ पात्र ग्राहक क्रमांक (विजेता) अपात्र ठरल्यास / संपर्क न झाल्यास / कोणत्याही कारणास्तव विजेत्याला बक्षीस वाटप न झाल्यास, प्रतीक्षा यादीत अनुक्रमानुसार येणारा पुढील ग्राहक बक्षीसासाठी पात्र असेल.

६. महावितरणकडे उपलब्ध डेटानुसार बक्षीस जिंकणाऱ्या ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर ग्राहकांना संपर्क / सूचित केले जाईल. विजेत्या ग्राहकाकडून १० दिवसांच्या आत प्रतिसाद न दिल्यास, अनु. क्र.५ नुसार सोडतीच्या प्रतिक्षा यादीत निवडलेल्या ग्राहक क्रमांकांना बक्षीस वाटप कारणेबाबतचा निर्णय पूर्णपणे महावितरणच्या अखत्यारीत राहील/असेल.

७. सदर योजने अंतर्गत लकी ड्रॉ ऑनलाइन पद्धतीने काढला जाईल. ग्राहक लकी ड्रॉच्या दिवशी दिलेल्या वेळेत महावितरणच्या फेसबुक पेजवरून सामील होऊ शकतात.

८. सदर योजने अंतर्गत लकी ड्रॉ हा योजना सुरु झाल्यापासून अनुक्रमे योजनेच्या चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या महिन्यात करण्यात येईल .





९. अकस्मात घटना घडल्यास (जसे की आग, पूर, संप, युद्ध, वैधानिक आवश्यकता इत्यादींसह परंतु इतकेच मर्यादित नाही.) सदरचा लकी ड्रॉ निलंबित कारणेबाबतचा निर्णय पूर्णपणे महावितरणच्या अखत्यारीत राहील/असेल आणि कोणताही विजेता ग्राहक अशा बक्षीसावर दावा करू शकत नाही.

१०. योजनेच्या कालावधीत ग्राहक/ग्राहक क्रमांक फक्त एकाच बक्षीसासाठी पात्र असेल.

११. विजेत्याने ओळखीचा पुरावा जसे की पॅन कार्ड आणि वास्तव्याचा पुरावा जसे की आधार कार्ड आणि चालू महिन्याचे वीज देयक व देयक भरणा केल्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे. काही प्रकरणांमध्ये ग्राहकाचे नाव आणि उपभोक्ता / वापरकर्ता / बिल भरणारे वेगळे असतात. जर ग्राहकाचा कायदेशीर वारस वापरत असेल आणि ग्राहकाच्या मृत्यूमुळे बक्षीसाचा दावा करत असेल, तर त्याने/तिने मृत्यू प्रमाणपत्र आणि कायदेशीर वारस प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. भाडेकरू ऑनलाइन भरणा करत असल्यास आणि बक्षीसाचा दावा करत असल्यास, भाडेकरूने ओळखपत्रांसह वैध भाडेपट्टी/भाडे करारनामा आणि मालकाचे ना–हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. नमूद केलेले अनिवार्य पुरावे सादर न केल्यास, अशा विजेत्या ग्राहकाचे बक्षीस रद्द करून आणि अनु. क्र.५ नुसार सोडतीच्या प्रतिक्षा यादीत निवडलेल्या ग्राहक क्रमांकांना बक्षीस वाटप कारणेबाबतचा निर्णय पूर्णपणे महावितरणच्या अखत्यारीत राहील/असेल.

१२. सदर योजने अंतर्गत दिली जाणारी बक्षिसे अहस्तांतरणीय आहेत. परंतु जर ग्राहकाचे नाव आणि उपभोक्ता वेगवेगळे असल्यास, वास्तविक उपभोक्ता / वापरकर्त्याने ''नोंदणीकृत ग्राहक'' कडून ना–हरकत पत्र आणि दोघांचे म्हणजेच नोंदणीकृत ग्राहक आणि वापरकर्ता यांचे ओळख दस्तऐवज सादर करणे आवश्यक राहील. मात्र याबाबतचा अंतिम निर्णय पूर्णपणे महावितरणच्या अखत्यारीत राहील/ असेल.

१३. सदर योजने अंतर्गत कोणतेही लागू शुल्क/कर बाबतची जबाबदारी सर्वस्वी विजेत्या ग्राहकाची असेल.

१४. सदर योजने अंतर्गत वितरीत केल्या जाणाऱ्या पारितोषिकांच्या संदर्भात, हे स्पष्टपणे नमूद करण्यात येते की, महावितरण यापैकी कोणत्याही उत्पादनाच्या गुणवत्तेची, कार्यप्रदर्शनाची हमी देत नाही किंवा प्रमाणित करत नाही आणि पारितोषिकांची वस्तू त्यांच्या उत्पादक/सेवा प्रदात्यांद्वारे त्यांच्या ग्राहकांना देऊ केल्या जाणाऱ्या वॉरंटी आणि विक्रीनंतरच्या सेवांच्या संदर्भात सामान्य अटी व शर्तीच्या अधीन असतील. अशा उत्पादनांच्या, सेवांच्या गुणवत्तेतील, कार्यप्रदर्शनात किंवा सेवेतील दोषाबाबत कोणताही वाद झाल्यास, विजेता ग्राहक महावितरणला जबाबदार धरू शकत नाही / महावितरण जबाबदार राहणार नाही आणि विजेत्या ग्राहकाने बक्षीस उत्पादनाच्या निर्माता/पुरवठादाराकडे प्रकरणाचा पाठपुरावा करावा.

१५. सदर योजना महावितरणच्या (महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड) विद्यमान कर्मचाऱ्यांसाठी नाही. जर विजेता ग्राहक महावितरणचे कर्मचारी किंवा कर्मचाऱ्याचे नातेवाईक (अशा कर्मचाऱ्याचे वडील/आई/पती/पत्नी/मुलगा/मुलगी) असल्याचे आढळून आल्यास, अशा व्यक्तीस देण्यात आलेले बक्षीस रद्द करून आणि अनु. क्र.५ नुसार सोडतीच्या प्रतिक्षा यादीत निवडलेल्या ग्राहक क्रमांकांना अनुक्रमानुसार बक्षीस वाटप कारणेबाबतचा निर्णय पूर्णपणे महावितरणच्या अखत्यारीत राहील/ असेल.

१६. सदर योजना महावितरणने ठरवलेल्या अटी व शर्ती च्या अधीन राहून राबविली जाईल. तसेच नमूद केलेल्या बक्षिसांमध्ये बदल करण्याबाबतचा अधिकार पूर्णपणे महावितरणच्या अखत्यारीत राहील/ असेल.



महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना

१७. सदर योजनेशी संबंधित कोणतीही समस्या/विवाद सोडविण्याचा अंतिम अधिकार,(त्यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या ग्राहकांबाबत) महावितरणच्या संबंधित मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता आणि वरिष्ठ व्यवस्थापक (वि व ले )/व्यवस्थापक (वि व ले) यांच्या समितीला असेल.

१८. सदर योजनेशी संबंधित कोणत्याही वादाच्या बाबतीत सदर प्रकरण केवळ मुंबई न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात हाताळले जाईल.

१९. भाषांतरित आवृत्ती मधील एखादया अटी व शर्ती च्या अर्थाबाबतीत विवाद असल्यास इंग्रजी आवृत्ती ग्राह्य धरण्यात येईल.

## प्रत्येक लकी ड्रॉसाठी अपेक्षित वेळापत्रक:

| विवरण | संबंधित विभाग | अपेक्षित वेळापत्रक |
|---|---|---|
| महावितरण वेब साइटवर विजेत्या ग्राहकाची निवड आणि घोषणा | मुख्य कार्यालय, महावितरण | लकी ड्रॉ महिन्याच्या ७ तारखेपर्यंत |
| विजेत्या ग्राहकांशी संपर्क | संबंधित विभाग/उपविभाग, महावितरण | लकी ड्रॉ महिन्याच्या १० तारखेपर्यंत |
| विजेत्या ग्राहकाची दस्तऐवज पडताळणी | संबंधित विभाग/उपविभाग, महावितरण | लकी ड्रॉ महिन्याच्या २० तारखेपर्यंत |
| पारितोषिक वितरण | संबंधित विभाग /उपविभाग, महावितरण | लकी ड्रॉ महिन्याच्या २५ तारखेपर्यंत |

## विजेत्यांसाठी सूचना:

१. महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लकी ड्रॉ घोषित केला जाईल. विजेत्यांची यादी महावितरणच्या वेबसाइटवर प्रसिद्ध केली जाईल.

२. महावितरणकडे उपलब्ध डेटानुसार बक्षीस जिंकणाऱ्या ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर ग्राहकांना संपर्क / सूचित केले जाईल.